कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेचे
के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक
डी.जी.पी नगर -१ नाशिक - ६
दुरध्वनी क्र. (०२५३) २४१४९१६
ई-मेल - principal-bed@kkwagh.edu.in

दिनांक :१४/०२/२०१९

# के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने गोदावरी स्वच्छता अभियान

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ, पुणे व के.के. वाघ शिक्षण संस्थेचे के.के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने गोदावरी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानात के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.भूषण वसंतराव कर्डिले यांनी उपस्थितांचे स्वच्छता अभियानाबाबत उद्‌बोधन केले. या दिवशी भावी शिक्षकांनी नाशिककरांसाठी श्रध्दास्थान असणा-या गोदावरीची स्वच्छता करत गोदामायीप्रति प्रेम व्यक्त केले.

गोदावरी स्वच्छता करत असतांना विद्यार्थ्यांनी नदी अस्वच्छतेने वेढली गेली आहे हे लक्षात घेतले आणि अभियान राबविले. आपले गोदावरी विषयी प्रेम व कृतज्ञता व्यक्त केली. गोदावरी तिरावरील रामकुंड, यशवंतराव महाराज पटांगण इ. परिसरात स्वच्छता केली. तसचे गोदा स्वच्छतेबाबत नागरिकांचेही प्रबोधन केले. या अभियानात सहभागी विद्यार्थ्यांनी नदीपात्रात उतरुन पात्रातील कचरा, प्लॅस्टिक पिशव्या, निर्माल्य संकलित करत गोदास्वच्छता केली. या अभियानातून विद्यार्थ्यांनी तरुणाईपुढे एक वेगळा आदर्श ठेवला.

या प्रसंगी गोदावरी स्वच्छता अभियान यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा. उषा क्षत्रिय, प्रा योगिता भामरे, प्रा. किर्ती चित्ते, प्रा. दिपाली सुर्यवंशी, प्रा. सुवर्णा बत्तासे, प्रा. प्रतिभा जाधव, प्रा.जयश्री वाघमारे, श्री. सोमनाथ गाजरे, श्री. सागर मुरकुटे, श्री. निरंजन शहाणे, कु.भाग्यश्री झोमन, श्री.भिकन बडगुजर व कविता झाडे हे सर्व उपस्थित राहूण महाविद्यालयाच्या अखंड परंपरेचे संवर्धन केले.

K. K. WAGH COLLEGE OF EDUCATION NASHIK

प्राचार्य
क.का वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय
नाशिक

******

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेचे
**के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक**
डी.जी.पी नगर -१ नाशिक - ६
दुरध्वनी क्र. (०२५३) २४१४९१६
ई-मेल - principal-bed@kkwagh.edu.in

जावक क्र.के.के.वाघ/बी.एड/ /२०१९ दिनांक : २१/०६/२०१९

## के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा

के.के. शिक्षणशास्त्र महाविद्यालय डी.जी.पी. नगर नाशिक येथे २१ जून २०१९ शुक्रवार रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी के.के.वाघ शिक्षण संस्थेतील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक व के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक येथील प्राचार्य डॉ.भूषण वंसंतराव कर्डिले तसेच श्री. शरद दंडगव्हाळ, निता निकम हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. कर्डिले यांनी मान्यवरांसह दिपप्रज्वलन केले. यानंतर श्री. शरद दंडगव्हाळ व निता निकम यांनी सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यांना योगाचे प्रात्याक्षीक करुन दाखविले तसेच सर्व उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांकडून योगा करुन घेतला. यामध्ये सर्वप्रथम प्रार्थना घेउन शिथिलीकरण अभ्यासात ग्रीवा चालन, स्कंध संचालन, कटी चालन व घुटना संचालन घेउन त्यानंतर ताडासन वृक्षासन, पदहस्तासन, अर्ध चक्रासन, त्रिकांणासन हे उभ्या स्थितीतील आसने घेतले. बैठे स्थितीतील भद्रासन, वज्रासन, अर्ध उष्ट्रासन, उष्ट्रासन, शशांकासन, उत्तान मंडूकासन, व वक्रासन याबरोबरच पोटासाठी आवश्यक असलेले मकरासन, भूजंगासन, कपालभाती, प्राणायाम, घेऊन ध्यान व संकल्प घेतला आणि या योगदिनाच्या कार्यक्रमाच्या शेवटी शोतीपाठाचे वाचन केले.

यावेळी डॉ. भूषण कर्डिले यांनी योगाच्या नियमीत सरावामूळे होणारे विविध फायदे सांगत योगासने प्रणायम आणि ध्यान धारना ही सर्व ताण तणाव नाहिशी करणारी प्रभावी तंत्रं आहेत असे नमूद केले. योग म्हणजे निव्वळ व्यायाम व आसन नव्हे तर भावनात्मक समतोल, शारीरिक आणि अध्यात्मीक प्रगती साधण्यासाठीचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे योगसाधना आहे असे सांगितले. ज्ञानयोग, भक्तियोग आणि कर्मयोग तसेच अष्टांग योगाची थोडक्यात माहिती सांगून योगाच्या विविध पध्दती आणि प्रक्रिया यांना संतूलित आणि एकत्र करून योगासनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे असे आवर्जून सांगितले.

K.K. WAGH COLLEGE OF EDUCATION NASHIK

Principal
K.K.Wagh College of Education
NASHIK

या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.उषा क्षत्रिय, प्रा.योगिता भामरे प्रा.किर्ती चित्ते, श्री. सोमनाथ गाजरे, श्री.सागर मुरकुटे, श्री. निंरजन शहाने, कु.भाग्यश्री झोमन, श्री. भिकन बडगूजर, कविता झाडे यांचे सहकार्य लाभले.

K.K. WAGH COLLEGE OF EDUCATION NASHIK

Principal
K.K.Wagh College of Education
NASHIK

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेचे
**के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक**
डी.जी.पी नगर –१ नाशिक – ६
दुरध्वनी क्र. (०२५३) २४१४९१६
ई–मेल – principal-bed@kkwagh.edu.in

जावक क्र.के.के.वाघ/बी.एड/ /२०१९ दिनांक : / /२०१९

# के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयामार्फत स्वच्छता अभियान साजरा

के.के. शिक्षणशास्त्र महाविद्यालयामार्फत डी.जी.पी. नगर नाशिक येथे दि. १७ नोव्हेंबर २०१९ रोजी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण कर्डिले यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता यशस्वीजीवनाचे सुत्र कसे आहे हे समजावून सांगितले. स्वच्छता ही शारीरिक आणि मानसिक अशी दोनही प्रकारची असते स्वतःपासून सुरुवात केली. तर आपण हळुहळू समाजात स्वच्छता आणू शकतो. स्वच्छतेच्या सवयी लहानपणापासून मुलांमध्ये रुजवाव्या लागतात. आपल्या निरोगी आणि स्वच्छ जीवनासाठी ही एक चांगली सवय आहे. चांगल्यसा आरोग्यासाठी सगळया आरोग्यासाठी सगळया प्रकारचे स्वच्छत आवश्यकता आहे मग ती स्वतःची व्यक्तिगत का असेना, आपल्या आजूबाजूच्या परिसरातीत, पर्यावरणाची, पाळीव प्राण्यांची काम करण्याची काम करण्याची जागा जसे शाळा महाविद्यालय इत्यादी ठिकाणी स्वच्छता ठेवायला पाहिजे. आपण सर्वांनी स्वतःच्या बाबतीत जागृत असले पाहिजेत. आपल्या दैनंदिन जीवनामध्ये स्वच्छता कायम असली पाहिजे. आपल्या रोजच्या सवयी मध्ये स्वच्छता अंगीकारली पाहिजेत त्यामुळे मोठे होऊ आपण एक आदर्श आाणि जबाबदार च्या रुपात देशाच्या उन्नतीला आणि प्रगतीला हातभार लावू शकतो.

या नंतर के.के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी डीजीपी कॅम्पस येथील प्लॅस्टिक गोळा करुन राबविले गेले. यावेळी विद्यार्थ्यांना सामाजिक कार्य केल्याचे समाधान प्राप्त झाले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.उषा क्षत्रिय, प्रा.योगिता भामरे प्रा.किर्ती चित्ते, श्री. सोमनाथ गाजरे, श्री.सागर मुरकुटे, श्री. निंरजन शहाने, कु.भाग्यश्री झोमन, श्री. भिकन बडगूजर, कविता झाडे यांचे सहकार्य लाभले.

K. K. WAGH COLLEGE OF EDUCATION NASHIK

Principal
K.K.Wagh College of Education
NASHIK

K.K. Wagh Education Society's
# K. K. WAGH COLLEGE OF EDUCATION, NASHIK.
[Marathi Medium]
☎ (0253) 2414916
Email : principal-bed@kkwagh.edu.in
disp-bed@kkwagh.edu.in

Recognized by :
● NCTE Order No. : WRC/5-6/102nd/2008/29945 dated 1/3/2008
● NCTE Order No. : WRC/APW04674/123576/2015/144560 dated 31/5/2015
● G. R. No. : B.Ed. Recog.2008/(119/08)/Mashi-1
● S.P. Pune University : ID No. : PU/NS/B.Ed (M)/114/2008

## के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयात योग दिन उत्साहात साजरा..

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय डी.जी.पी.नगर,नाशिक येथे दिनांक २१-०६-२०२३ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला.योग दिनानिमित्त योगाचे आसन घेण्यासाठी महाविद्यालयात योगशिक्षक पंकज राजपूत यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रा. शोभा झुंजारे यांनी योग शिक्षक पंकज राजपूत सर यांचा परिचय करून दिला. पंकज राजपूत सर हे योग शिक्षक, योग अध्यापक, योग पंडित असून ते २४ वर्षापासून योग क्षेत्रात कार्यरत आहेत. योग दिनानिमित्त पंकज सरांनी विद्यार्थ्यांना आरोग्याची काळजी कशी घ्यावी तसेच योगाचे फायदे सुद्धा सांगण्यातआले.पंकज सरांनी योगासनाचे सर्व आसन त्यांच्या मार्गदर्शनाखाली करून घेतले त्यामध्ये वक्रासन , शिर्षासन , ताडासन , भुजंगासन , व मेडिटेशन सुद्धा विद्यार्थ्यांकडून करून घेतले तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्स्फूर्तपणे सर्व योगाचे आसन केले. तसेच महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सुद्धा योगा आसन अतिशय उत्स्फूर्तपणे केले.

योग दिवसासाठी महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. भूषण वसंतराव कर्डिले सर उपस्थित होते. प्रा. शोभा झुंजारे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते . तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद डॉ. उषा क्षत्रिय ,प्रा.योगिता भामरे, डॉ.कीर्ती चित्ते, प्रा.सुवर्णा बत्तासे, प्रा.दीपाली सूर्यवंशी, प्रा.योगिता कोल्हे तसेच शिक्षकेतर कर्मचारी सोमनाथ गाजरे, निरंजन शहाणे, भाग्यश्री झोमन,भिकण बडगुजर यांचे सहकार्य लाभले.

f. Bhushree

प्राचार्य
के.के.वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय
नाशिक

sent as on 21/6/23 01:33 pm